




Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# कोरोना महामारी
# आणि
# भारत

**- संपादक -**

डॉ. वाकणकर जी.बी.
प्रा.देवराये एस.एम.
डॉ.टेंगसे एस.ए.

**NOTION PRESS**

NOTION PRESS

India. Singapore. Malaysia.

Published by Notion Press 2021
Copyright © Wakankar G.B., Devraye S. M., Tengse S. A. 2021
All Rights Reserved

ISBN 9781-6387-3493-2

This book has been published with all reasonable efforts taken to make the material error-free after the consent of the author. No part of this book shall be used, reproduced in any manner whatsoever without written permission from the author, except in the case of brief quotations embodied in critical articles and reviews.

The Author of this book is solely responsible and liable for its content including but not limited to the views, representations, descriptions, statements, information, opinions and references ["Content"]. The Content of this book shall not constitute or be construed or deemed to reflect the opinion or expression of the Publisher or Editor. Neither the Publisher nor Editor endorse or approve the Content of this book or guarantee the reliability, accuracy or completeness of the Content published herein and do not make any representations or warranties of any kind, express or implied, including but not limited to the implied warranties of merchantability, fitness for a particular purpose. The Publisher and Editor shall not be liable whatsoever for any errors, omissions, whether such errors or omissions result from negligence, accident, or any other cause or claims for loss or damages of any kind, including without limitation, indirect or consequential loss or damage arising out of use, inability to use, or about the reliability, accuracy or sufficiency of the information contained in this book.

# अनुक्रमणिका


1. कोरोना आणि भारत : सर्वकष परिणामाची मीमांसा
प्रा.डॉ.कदम एच.पी. ......... 1

2. कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम - एक अभ्यास -
प्रा .डॉ .अण्णाजी मडावी ......... 9

3. कोरोनाचा पर्यावरणावरील परिणाम -
डॉ. सचिन व्ही. तावडे ......... 18

4. महाराष्ट्र शासनाची कोरोना विरुद्धची मोहीम' : माझे कुटुंब ,माझी जबाबदारी 'ते' मी जबाबदार' -
शरद बाबुराव सोनवणे ......... 24

5. माणसाच्याच अस्तित्वाची ही लढाई आहे...
प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे ......... 33

6. कोरोना महामारीचा भारतीय समाजावरील परिणाम
प्रा. विलास सोमा पवार ......... 39

7. आर्य सत्य व कोरोना... प्रा.डॉ.तोळमारे शशिकांत शिवापा ......... 46

8. कोरोना आणि भारतीय समाजव्यवस्था
पा. डॉ. मारोती बालासाहेब भोसले ............ 51

9. कोरोना आणि भारत -प्रा.डॉ.निंबा बळवंत कोठावदे ......... 60

10. कोरोना आणि मानसिक स्वास्थ्य -
प्रा.अनिल शशिकांत हिरगोंड ......... 66

11. कोरोना महामारीचा पभाव - प्रा .डॉ. आंधळे बी.व्ही ......... 75

12. कोरोना महामारीचा स्त्रियांच्या आयुष्यावरील परिणाम
डॉ सीमा शशिकांत कदम. ......... 83

13. कोरोना महामारीत भारतीय अर्थव्यवस्था : मानवी अधिकार उल्लंघन
नांगरे विठ्ठल हरिभाऊ ......... 90

14. कोरोना साथरोग आणि समाजातील अंधश्रद्धा
प्रा. डॉ. संतोष वसंतराव रणखांब .......103

15. कोरोनाचा भारतीय शिक्षण व्यवस्धेवरील परिणाम
प्रा. निखिता गावकर ......... 116

16. कोरोनाचा भारतीय शेती व्यवसायावर झालेला परिणाम
प्रा .विनायक जाधव ....... 120

17. कोविड १९ विषाणूचा भारतीय उच्च शिक्षणावरील प्रभाव
प्रा.डॉ. मुक्ता सोमवंशी ....... 126

18. कोरोना १९ महामारीचे परिणाम, आव्हाने आणि संधी
डॉ. एम बी वाघ ....... 133

19. करोना भारतीय शिक्षणव्यवस्थेवरील परिणाम
प्रा. आनंद मुसळे ....... 140

20. कोविड-१९ (Covid-19): भारतीय अर्थव्यस्थेवर झालेले परिणाम
अर्जुन अशोक मोरे ....... 147

21. कोरोना महामारी - डॉ.काळे बी.एम ....... 155




Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

22. कोरोना के समय का भारत - डॉ कुलकर्णी वनिता बाबुराव ....... 162

23. कोरोणा व्हायरस महामारी और मानवता की परीक्षा
प्रा.डॉ.महावीर सुरेशचंद उदगीरकर ....... 172

24. कोरोनाचा शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम
प्रा.डॉ.मारोती धोडींबा कच्छव ......... 183

25. कोरोना काळातील लॉकडाऊनचे श्रमशक्ती व अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम
प्रा .डॉ .पांडुरंग मुंढे ....... 194

26. कोरोनाचा भारतीय शिक्षण व्यवस्थेवरील परिणाम
प्रा. संदीपकुमार मारोतराव देवराये ........200



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



# कोरोनाचा भारतीय शिक्षण व्यवस्थेवरील परिणाम

**प्रा. संदीपकुमार मारोतराव देवराये**
रसायनशास्त्र विभागप्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ जि. परभणी,
महाराष्ट्र
smdevraye@gmail.com

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

====

**प्रस्तावना -** Covid-19 च्या प्रकोपामुळे संपूर्ण राष्ट्र व राष्ट्राची अर्थव्यवस्था ढवळून निघाली आहे. पण सर्वात जास्त संभ्रमाचे वातावरण आहे ते शिक्षणक्षेत्रात. नेमके काय करावे, याबाबत एवढा संभ्रम यापूर्वी आपण कधीच अनुभवला नव्हता. आज जेव्हा कोरोना व्हायरसने आपण ग्रहित धरलेले जग हादरून टाकले आहे आणि व्यापक प्रमाणावर मानसिक चिंता आणि अस्तित्वाची अनिश्चितता निर्माण केली आहे. कोरोना विषाणूची साथ हे दुसऱ्या महायुद्धानंतर चे जगासमोर चे मोठे संकट आहे. मानवी जीवनाच्या सर्वच बाजूवर या संकटाने प्रभाव टाकला आहे. या रोगाला प्रतिजैविके सापडूनही हा रोग आटोक्यात न आल्यामुळे प्रतिबंधक उपाय योजने एवढाच आता सर्वासमोर पर्याय आहे. म्हणून लोक डाऊन चे धोरण अवलंबून हा रोग आटोक्यात आणण्याचा सर्व देशात प्रयत्न चालू आहे. या परिस्थितीतून निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे जगभर भीतीचे वातावरण पसरले आहे.जगभरातील व देशातील विद्यार्थ्यांच्या जीवनावर लॉकडाउन चा प्रभाव जास्त झालेला दिसून येतो .लॉकडाउनच्या च्या काळात विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान भरून काढणे

म्हणजे परीक्षा पुढे ढकलले नव्हे,तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही याची काळजी घेणे होय .कष्टकरी जनतेची मुले डोळ्यासमोर ठेवून शाळा बंदच्या काळात या समाज घटकातील मुलांचे शिक्षण कसे अखंडपणे चालू राहील याची योजना केंद्र व राज्य सरकारांनी करावी.जागतिक व देशाच्या अर्थव्यवस्था लोकडाऊन मुळे मंदी बेरोजगारांच्या चक्रात अडकल्यामुळे डळमळीत होत आहे. ठप्पझालेल्या या अर्थव्यवस्थेमुळे हातावर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांचे तांडे शहराकडून गावाकडे निघाले आहेत व उपासमारीनेमरायचे कीकोरोनामुळे या पेचात हा कष्टकरी वर्ग अडकला आहे लॉकडाउन मुळे, येणाऱ्या सक्तीच्या रिकामे पणामुळे व एकटेपणामुळे कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. कोविडनंतर आपण सर्वजण एका स्थित्यंतराचाटप्प्यात आहोत. आपल्याला हवे किंवा नको असले तरी खूप मोठे बदल आपल्या आयुष्यातहोणारआहेत. काही गोष्टी आधीपासूनच आपली जागा बनविण्याच्या प्रयत्नात होत्या आणिलॉककडाऊन मुळे ती संधी त्यांना मिळाली.

**शिक्षण क्षेत्रावर होणारा परिणाम**

करोनालारोखण्यासाठी अनेक देशांनी शिक्षण संस्था सुद्धा बंद झाल्या. युनेस्कोच्या अहवालानुसार एप्रिल 20 20 मध्ये 188 देशात 154 कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. भारतात 15 लाख शाळा बंद आहेत त्यामुळे 26 कोटी विद्यार्थी व 89 लाख शिक्षक घरी बसले आहेत, तर उच्च शिक्षणात 50 हजार शिक्षणसंस्था बंद आहेत व 3.7 कोटी विद्यार्थी आणि 15 लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसले आहेत. 30 कोटी विद्यार्थ्यांनी रिकामी पणे घरी बसणे हा एक टाईमबॉम्ब आहे.सध्याकरोनाची समस्या ही केवळ आरोग्याची



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



समस्या आहे.पण या संकटाला शैक्षणिक समस्याची बाजू आहे हे सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. लोकांचे रिकामेपण एकटेपण घालविण्यासाठी रामायण महाभारतासारख्या मालिका दूरदर्शन वर दाखवून भूतकाळाच्या आभासी जगात जनतेला रमवून वर्तमानातील समस्यावर मात करता येणार नाही.

युनेस्को ने शाळाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांच्या या समस्येवर तातडीने मार्ग काढण्याचा सूचना आपल्या सभासद देशांना दिल्या आहेत. शिक्षणात आलेल्या व्यक्ती यांनी मुलांना शिक्षण हक्क पासून वंचित राहावे लागत आहे.दूरशिक्षण माहिती-तंत्रज्ञानाचा वापर युट्युब, हग आऊट, मल्टिमीडिया, मोबाईल फोन, ई लायब्ररी,दूरदर्शन इत्यादी माध्यमातून अनेक देशांनी तातडीने मुलांचे शिक्षण खंडीत होऊ नये म्हणून वरील प्रकारचे उपक्रम सुरू केले आहेत. भारतात मात्र परीक्षा रद्द करणे, परीक्षा पुढे ढकलणे, परीक्षा न घेता मुलांना पुढच्या वर्गात प्रवेश देणे एवढ्यापुरतेच निर्णय घेतले जात आहेत.परिस्थितीची अनिश्चितता लक्षात घेतली तर भारताने सुद्धा दीर्घकाळासाठी शैक्षणिक धोरण ठरविणे आवश्यक आहे.

भारतात उच्च शिक्षणात व मेडिसिन कॉमर्स व मॅनेजमेंट यासारख्या व्यवसायिक अभ्यासक्रमात माहिती-तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. विद्यार्थी आर्थिक दृष्ट्या वरच्या स्तरावरील असल्यामुळे लॅपटॉप, इंटरनेट इत्यादी खर्च त्यांना परवडतो, त्यामुळे प्रामुख्याने अभिजन वर्गाच्या छोट्या गटांचा अभ्यास ऑनलाइन चालू आहे. हाच अनुभव शालेय शिक्षणातही आहे, ज्या उच्च मध्यमवर्गीयांची मुले सर्व सोयींनी युक्त अशा पंचतारांकित शाळेत जात आहेतत्यांचाही ऑनलाइन शिक्षण समस्या आहे.बहुसंख्य कष्टकरी गरीब वर्गातील मुलांची भटके विमुक्त आदिवासी ग्रामीण भागातील सरकारी किंवा अनुदानित

शाळेत जाणाऱ्या मुला-मुलींची माहिती- तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचा प्रसार, शिक्षणाचा विस्तार, शिक्षणाचा दर्जा, शिक्षणाची संधी वाढविण्यास भरपूर वाव आहे. 'ट्राय'च्या अहवालानुसार भारतात 2020 मध्ये इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या 68.5 कोटी आहे मोबाईल फोन वापरणाऱ्यांची संख्या 48.72 कोटी आहे तर इंटरनेट सह स्मार्टफोन वापरणाऱ्यांची संख्या 40..72 कोटी आहे, तर टीव्ही पाहणार्यांची संख्या 76 कोटी आहे हा माहिती तंत्रज्ञानाचा विस्तार झालेला दिसत असला तरी त्यात प्रचंड विषमता आहे. भारतात 52 टक्के जनता इंटरनेटचा वापर करते, तर 67 टक्के पुरुष व 38 टक्के स्त्रिया भारतात इंटरनेटचा वापर करतात.

माहिती तंत्रज्ञान हे शहरी सदन वर्ग व पुरुष यांचीच सध्यातरी मक्तेदारी होत आहे त्यामुळे नॅशनल डिजिटल लायब्ररी स्वयम्, शोधगंगा, इत्यादी सरकारी प्रकल्पांचा फायदा मर्यादित होत आहे .या प्रकल्पाच्या कम्प्यूटर ची किंमत, इंटरनेटचा खर्च विजेचा पुरवठा इत्यादी प्रमुख अडचणी आहेत,त्यामुळे ऑनलाइन शिक्षण ही चैन शहरातील सदन वर्गाला परवडते.अनेक अप्रगत देशात सुद्धा अशीच परिस्थिती आहे,म्हणून त्या देशांनी टीव्ही माध्यमाचा वापर शाळा बंदच्या काळात जास्त करायला सुरुवात केली आहे. भारतात 900 हून अधिक टीव्ही चॅनल्स आहेत, घरी बसलेल्या विद्यार्थ्यासाठीया चॅनेल चा वापरकसा करून घेता येईल याबद्दल शिक्षण खात्याकडून काही पावले उचलली जाणे आवश्यक आहे.

परदेशात शिक्षणासाठी गेलेले भारतीय विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यासमोर लॉकडाऊन मुळे अडचणीचे डोंगर उभे राहिले आहेत. अभ्यासक्रमाचे बिघडलेले वेळापत्रक आर्थिक ताण, व्हीजाच्या मुदतीचे प्रश्न,नोकरी मिळवण्याची अनिश्चितता शिक्षण कर्जाच्या हप्त्याचे दडपण इत्यादी मुळे परदेशातील भारतीय विद्यार्थी दडपणाखाली आहेत. काही परदेशी विद्यापीठे या काळात पर्याय



Late Ramesh Warpudkar ACS College ★ Sonpeth Pin-431516 ★ Ta.Sonpeth Dist.Parbhani



म्हणून चौथ्या औद्योगिक क्रांतीचे तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्ता रोबोटिक याचा वापर करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण एकूण 750000 परदेशातील भारतीय विद्यार्थी संकटात आहेत. त्यांना मदत करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालय अर्थ मंत्रालय व मानव विकास मंत्रालयाची एकत्रित योजना करणे ही काळाची गरज आहे.5 एप्रिल रोजी मानव संसाधन मंत्री पोखरियाल यांनी असे आश्वासन दिले आहे की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान या लॉकडाउन काळात होणार नाही याची काळजी घेतली जाईल.शैक्षणिक नुकसान म्हणजे परीक्षा पुढे ढकलले नव्हे, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही याची काळजी घेणे होय. कष्टकरी जनतेची मुले डोळ्यासमोर ठेवून शाळा बंदच्या काळात या समाज घटकातील मुलांचे शिक्षण कसे अखंडपणे चालू राहील याची योजना सरकारने करावी. विद्यार्थी आणि पालक कमी शुल्क अभ्यासक्रम, अल्प मुदतीचा अभ्यासक्रम आणि ऑनलाईन शिक्षण याकडे गतिमान री-स्किलिंगपर्याय म्हणून अधिक लक्ष देऊ शकतात.शहराबाहेरील विद्यार्थ्यांना असलेल्या कोरोना च्या धोक्यामुळे आणि न परवडणारी विकल्प असल्याने हॉस्टेलमधील प्रवेश कमी होऊ शकतात. पालक त्यांच्या मुलांना घरी राहून स्थानिक पातळीवर शिक्षण देण्यास प्राधान्य देतील. प्लेसमेंटमध्ये मोठी पोकळी जाणवेल परंतु विनामूल्य इंटरंशिप वाढू शकेल.

अनेक ठिकाणी विद्यार्थी ऑनलाइन कडे वळत आहेत. लॉकडाऊन जाहीर केल्यानंतर लगेच जवळपास सर्व वर्ग गुगल मीट किंवा झुमवर घेतले जात आहे,पण असं असलं तरी विद्यापीठात काही विद्यार्थी असे आहे ज्यांना इंटरनेट कनेक्शन विषयी समस्या आहेत, यामध्ये काश्मीर आणि इतर दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. देशातील अनेक खाजगी शाळांनी आता झूम ॲप

वर वर्ग घेण्यास सुरुवात केली आहे .पण ही फक्त तात्पुरती सोय आहे असं एक पालकांचं म्हणणं आहे. ऑनलाईन शिक्षणाच्या अनुभवाची गुणवत्ताही ठीक आहे शिक्षकाला विद्यार्थ्यांची वन- टू -वन संवाद साधायला इथं मर्यादा येते. आता नवीन सत्र सुरू होत असल्याने ऑनलाइन शिक्षणाचा अजूनच जास्त गाजावाजा होऊ लागला आहे. मात्र याबाबत शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांमध्ये ही प्रचंड संभ्रम आहे. शाळा,महाविद्यालये, विद्यापीठ आणि शासन यापैकी कुणालाच नक्की काय भूमिका घ्यायची आहे, हे समजत नाहीये. तर दुसरीकडे केंद्र शासन नवीन शिक्षा नीति आणायची तयारी सुरू झाली आहे.

यंदा संस्कृतीची अधिवेशनहीं व्हर्च्युअल होतील अशी स्थिती आहे. या परिस्थितीत शिक्षकांना विद्यार्थ्यांसमोर ऑनलाइन वर्ग घेण्याचा दबाव वाढतोय. मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या स्वयम् गव्हर्मेंट इन या पोर्टल वर भारतातील नामांकित संस्थांच्या शिक्षकांनी तयार केलेले कोर्सेस येथे अगदी विनामूल्य उपलब्ध आहेत. कोणत्याही विषयात अद्ययावत माहिती मिळू पाहणाऱ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. आता वेगवेगळ्या संस्थांनी शिक्षकांसाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम सुरू केले आहेत. ऑनलाइन शिक्षण कसे देता येईल त्यासाठी वेगवेगळ्या कंपन्यांची कोणती साधने कोणते आपलिकेशन आहे. याविषयीची माहिती दिली जाते अद्ययावत व्हायचा प्रयत्न शिक्षक करत आहेत. पण हातात वेळ नाही काय करू नि काय नको इतके ते गोंधळलेले आहेत.

शिक्षक, विद्यार्थी , पालक आणि शासन अशा सगळ्यांना आज आता आपल्या मानसिकतेत बदल करावा लागणार आहे. शिक्षकांना नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे लागेल. काळाबरोबर रहावे लागेल. ऑनलाईन शिक्षणाच्या व्यवसायाला भांडवल जास्त



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



लागत नाही त्यामुळे बेरोजगार हुशार तरुण याकडे संधी म्हणून पाहतील यात आश्चर्य नाही. जर शिक्षण खरोखरच जीवनदायी आहे, तर शिक्षणाने तरुण मनांना जागृत केले पाहिजे त्यांच्या जाणीवेंतील सखोल पातळीवर जाऊन covid-19 ने निर्माण झालेल्या संकटाचा सामना करण्यासाठी त्यांना मानसिक सामर्थ्य दिले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांबरोबर लयबद्ध संवाद निर्माण करून त्यांच्या समस्या आणि शंका समजून घेतल्या पाहिजेत. आता भय सामान्य आहे बळींना बदनाम केले जात आहे आणि अंतर राखणे हा नवा परवलीचा शब्द झाला आहे.अशा परिस्थितीत आपण स्वतः बरोबरच आणि जगा बरोबरचे सबंध पुन्हा परिभाषित करण्यासाठी एकत्र काम केले पाहिजे काळाची गरज ही जागृत बुद्धिमत्ता सखोल धार्मिकता आणि गहन संवेदनशीलता यांचे एकत्रीकरण आहे हे एक शिक्षक म्हणून आपण या प्रक्रियेत भाग घेऊन अधिकृत अभ्यासक्रमाच्या पलीकडे पाहू शकतो.

तात्पर्य काय तर, covid-19 नंतर जग बदलणार आहे आणि आपण या बदलासाठीतयार होउया कुसुमाग्रजांच्या शब्दात सांगायचे झाले तर "अनंत आमुचीध्येया शक्ती ,अनंत आमच्या आशा किनारा".

**संदर्भ**


1) www.bbc.com
2) m.marathi.thewire.in- अभिजित पाठक
3) maharashtratimes.com - प्रा. शरद जावडेकर
4) www.esakal.com - सकाळ वृत्तसेवा
5) www.tv9marathi.com - शितल मुंडे
6) orfonline.org - प्रसाद शिरगावकर




PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani